# ॲग्रोमेट ॲडवायझरी बुलेटीन

## ग्रामिण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु, कोल्हापूर

## विभागीय कृषि संशोधन केंद्र, शेंडा पार्क, कोल्हापूर

दूरध्वनी : (०२३१) २६९२४१६ ईमेल: adrkolhapur@rediffmail.com

### हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला समितीची साप्ताहिक बैठक दि. ०१.०९.२०२६

जिल्हा : सांगली

| मागील आठवड्यातील हवामान (२६.०८.२०२६ ते ०१.०९.२०२६) | | | | | | | हवामान घटक | पुढील पाच दिवसांचा हवामानाचा अंदाज (०२.०९.२०२६ ते ०६.०९.२०२६) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २६ | २७ | २८ | २९ | ३० | ३१ | ०१ | दिनांक | ०२ | ०३ | ०४ | ०५ | ०६ |
| - | - | - | - | - | - | - | पाऊस (मिमी) | २ | २ | ३ | ४ | २ |
| - | - | - | - | - | - | - | कमाल तापमान (अं.से.) | ३१ | ३० | २९ | २९ | २९ |
| - | - | - | - | - | - | - | किमान तापमान (अं.से.) | २२ | २२ | २२ | २२ | २२ |
| - | - | - | - | - | - | - | ढग स्थिती (आकाश) | ८ | ८ | ८ | ६ | ४ |
| - | - | - | - | - | - | - | सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | ९० | ९० | ८९ | ९१ | ९१ |
| - | - | - | - | - | - | - | दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | ६६ | ६७ | ६९ | ६४ | ६६ |
| - | - | - | - | - | - | - | वाऱ्याचा वेग (किमी/तास) | १७ | १७ | १९ | १६ | १४ |
| - | - | - | - | - | - | - | वाऱ्याची दिशा | प. | प.नै. | प.नै. | प.नै. | प.नै. |

### हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला

| पीक | अवस्था | कृषि विषयक सल्ला |
|---|---|---|
| हवामान सारांश | | प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई यांचेकडून प्राप्त झालेल्या हवामान अंदाजानुसार सांगली जिल्ह्यामध्ये २, ३, ४, ५ व ६ सप्टेंबर रोजी आकाश सामान्यत: ढगाळ राहण्याची शक्यता आहे. सांगली जिल्ह्यामध्ये २ ते ६ सप्टेंबर दरम्यान तुरळक ठिकाणी खूप हलक्या स्वरुपाच्या पावसाची शक्यता आहे. सांगली जिल्ह्यामध्ये ६ सप्टेंबर पर्यंत कमाल तापमान २९.० ते ३१.० अंश सेल्सिअस दरम्यान राहण्याची तसेच किमान तापमान २१.० ते २२.० अंश सेल्सिअस या दरम्यान राहण्याची शक्यता आहे. सकाळची सापेक्ष आद्रता ८९ ते ९१%, दुपारची सापेक्ष आद्रता ६४ ते ६९% तसेच वाऱ्याचा वेग ताशी १४ ते १९ किमी या दरम्यान राहण्याची शक्यता आहे. |
| विस्तारित श्रेणी अंदाज | | विस्तारित श्रेणीच्या अंदाजानुसार मध्य महाराष्ट्रामध्ये दिनांक ४ ते १० सप्टेंबर दरम्यान पावसाचे प्रमाण सरासरी दरम्यान राहण्याची, कमाल तापमान सरासरी पेक्षा जास्त राहण्याची तसेच किमान तापमान सरासरी पेक्षा जास्त राहण्याची शक्यता आहे. |
| सामान्य सल्ला | | ❖ शेतकरी बांधवांनी हवामान आधारित शेतीविषयक सल्ला आपल्या अँड्रॉइड मोबईलवर मिळविण्यासाठी गुगल प्ले स्टोअर वरून " मेघदूत" अँड्रॉइड ॲप्लिकेशन तर मेघगर्जना व विजांचा कडकडाट इ.च्या अंदाजासाठी "दामिनी" अँड्रॉइड ॲप्लिकेशन डाउनलोड करावे व त्याचा वापर करावा.<br>❖ कीटकनाशके व बुरशीनाशकांची फवारणी पावसाची उघडीप पाहून आणि वारा शांत असताना करावी.<br>❖ मध्य व पूर्व भागातील शेतकरी बांधवांनी खरीप पिकांच्या वाढीच्या महत्त्वाच्या अवस्थेत पाण्याचा ताण टाळण्यासाठी संरक्षित पाणी द्यावे. |
| संदेश | | ❖ जिल्ह्याच्या मध्य व पूर्व भागातील शेतकरी बंधूंनी जमिनीमध्ये ओलावा टिकवून ठेवण्यासाठी खरीप पिकांमध्ये आच्छादनांचा वापर करावा |
| मका | शाकिय वाढ | ➢ मध्य व पूर्व भागातील शेतकरी बांधवांनी पीक फुलोऱ्यामध्ये येण्यापूर्वी संरक्षित पाणी द्यावे<br>➢ मका पेरणीस ४० ते ४५ दिवस झाले असल्यास नत्र खताचा हप्ता देण्यासाठी युरिया ३५ किलो प्रती एकरी या प्रमाणात द्यावा त्यनंतर ४ ते ५ दिवसणी फुले मायक्रोन्यूट्रियंट ग्रेड २ याची ५ ते ७ मिलि प्रती पाणी याप्रमाणात फवारणी करावी<br>➢ मक्याच्या मध्यम ते शेवटच्या पोंगा या वाढीच्या अवस्थेत लष्करी अळीचा १० ते २०% प्रादुर्भाव आढळल्यास खालीलपैकी एका कीटकनाशकाचा आलटून पालटून वापर करावा. ( प्रमाण प्रति १० लिटर पाणी)<br>➢ १. आयसोसायक्लोसिरम १८.१% एस सी (६ मिली) किंवा<br>➢ २. स्पीनेटोरम ११.७% एस सी (५ मिली) किंवा<br>➢ ३. ब्रोफ्लानीलीड २०.०% एस सी (२.५ मिली) किंवा<br>➢ ४. फ्लूबेनडायअमाईड २०.०% डब्लू जी (५ ग्रॅम) किंवा<br>➢ कीटकनाशकांचा वापर चारा पिकावर करू नये. प्रतीक्षा कालावधीचे पालन करावे. |
| ऊस | शाकिय वाढ | ➢ सुरू ऊसास २% युरिया किंवा २ % डी.ए.पी. किंवा २ % १९:१९:१९ यापैकी एक फवारणी घ्यावी<br>➢ आडसली ऊस लागवडीस ६ ते ८ आठवडे झाले असल्यास युरिया १३९ किलो प्रती एकर याप्रमाणात द्यावा<br>➢ मागील आठवड्यामध्ये वाढलेल्या आद्रतेमुळे काही ठिकाणी तपकिरी ठिपके व तांबेरा या रोगांचा प्रादुर्भाव दिसून येत आहे. नियंत्रणासाठी पावसाची उघडीप पाहून ॲझोऑक्सीस्ट्रॉबीन १८.२ % + डायफेनकोन्याझोल ११.४% एस.सी. ०.१% १० मिलि प्रती १० लीटर पाणी याप्रमाणात फवारणी करावी<br>➢ आडसली लागवड केली असल्यास आणि काही ठिकाणी गॅप आढळून आल्यास रोपवाटीकेमधील रोपांच्या सहाय्याने नांग्या भरून घ्याव्यात.<br>➢ वाढलेली आद्रता व कमाल तापमानामध्ये झालेली वाढ यांमुळे ऊसावर काही ठिकाणी लोकरी मावा व पायरीला या रसशोषक किडींचा प्रादुर्भाव दिसून येत आहे. प्रादुर्भाव दिसून येताच व्यवस्थापणासाठी क्लोरपायरीफॉस २०% ई. सी. ३० मिलि प्रती १० लीटर पाणी किंवा ॲसिफेट५०% + इमिडाक्लोप्रिड १.८०% एस.पी. या संयुक्त कीटकनाशकाची ५० मिलि प्रती १० लीटर पाणी |

**दूरध्वनी : (०२३१) २६९२४१६** **ईमेल: adrkolhapur@rediffmail.com**


| | | |
|---|---|---|
| | | यासाप्रमाणात मिसळून फवारणी करावी |
| सोयाबीन | फुलोरा ते शेंगा भरणे | ➢ वाढलेली आर्द्रता व कमाल तापमान यांमुळे पानांवरील व शेंगांवरील करपा रोगाचा प्रादुर्भाव दिसून येत आहे. नियंत्रणासाठी टेब्युकोनाझोल १०% + सल्फर ६५% डब्ल्यू.जी. २५ ग्रॅम किंवा टेब्युकोनाझोल २५.९% ई.सी. १२.५ मि.ली. प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.<br>➢ पेरणीनंतर ६० ते ६५ दिवस झाले असल्यास फुले मायक्रोन्यूट्रियंट ग्रेड दोन ५ मिलि प्रती लीटर पाण्यात मिसळून फवारणी करावी<br>➢ काही ठिकाणी हलक्या स्वरूपाचा पाऊस, कमाल तापमानातील वाढ आणि वाढलेली आद्रता यांमुळे पाने खाणारी अळीचा (स्पोडोप्टेरा) प्रादुर्भाव दिसून येत आहे. नियंत्रणासाठी पुढील उपाययोजना कराव्यात<br>➢ आर्थिक नुकसान पातळी: १० अळया/मीटर ओळीत पीक फुलोऱ्यात येण्यापूर्वी<br>➢ प्रतिबंधात्मक उपाय: पिकामध्ये हेक्टरी ५ याप्रमाणे स्पोडोप्लुरचा वापर करून फिरोमोन सापळे लावा<br>➢ नियंत्रण: फ्लूबेंडामाईड २० % डब्लू.जी. ६ ग्रॅम अथवा फ्लूबेंडामाईड ३९.३५% एसी ३ मिली अथवा इंडोक्झाकार्ब १५.८० % ई.सी. ६ मिली अथवा स्पिनेटोरम ११.७०% एस.सी. १० मिली प्रति १० लिटर पाणी या प्रमाणे फवारणी करावी.<br>➢ मध्य व पूर्व भागातील शेतकरी बांधवांनी संरक्षित पाण्याची उपलब्धता करावी |
| भुईमूग | फुलोरा ते आऱ्या सुटणे | ➢ सततचा पाऊस आणि हवेतील जास्त आद्रता यामुळे भुईमुग पिकावर टिक्का आणि तांबेरा या रोगांचा प्रादुर्भाव होऊ शकतो. प्रादुर्भाव दिसून येताच नियंत्रणासाठी फ्ल्यूबेनडॅमाईड ३.५% + हेक्झाकोनॅझोल ५% डब्ल्यू. जी. २५ ग्रॅम १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| मूग | शेंगा भरणे ते पक्वता | ➢ पावसाची उघडीप पाहून पक्व झालेल्या शेंगांची वेळेत काढणी करावी. काढणी उशिरा केल्यास पक्व झालेल्या शेंगा तडकतात.<br>➢ पावसाची शक्यता असल्याने काढणी केलेल्या शेती मालाची सुरक्षित ठिकाणी साठवणूक करावी. (मध्य व पूर्व भाग) |
| उडीद | शेंगा भरणे ते पक्वता | ➢ पावसाची उघडीप पाहून पक्व झालेल्या शेंगांची वेळेत काढणी करावी. काढणी उशिरा केल्यास पक्व झालेल्या शेंगा तडकतात.<br>➢ पावसाची शक्यता असल्याने काढणी केलेल्या शेती मालाची सुरक्षित ठिकाणी साठवणूक करावी. (मध्य व पूर्व भाग) |
| वांगी | फळधारणा | ➢ ढगाळ हवामानामुळे पांढरी माशी या किडीचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता आहे. प्रादुर्भाव झाल्यास नियंत्रणासाठी शेतामध्ये चिकट सापळे एकरी २० ते २५ या प्रमाणात लावावेत. |
| द्राक्ष | शाकिय वाढ | ➢ ज्या भागात मुसळधार पाऊस झाला आहे, तेथे बुरशीजन्य करपा रोगाच्या नियंत्रणासाठी थायोफेनेट मिथाइल किंवा कार्बेन्डाझिम १ ग्रॅम प्रतिलिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. रोगाचा प्रादुर्भाव अधिक असल्यास हेक्झाकोनाझोल किंवा डायफेनोकोनाझोल यांसारख्या ट्रायझोल गटातील बुरशीनाशकांचा शिफारशीनुसार वापर करावा. तसेच ट्रायकोडर्मा ३ ते ४ मिली प्रतिलिटर पाण्यात मिसळून वेलींवर फवारणी करावी.<br>➢ पानांवर ओलावा असल्यास केवडा रोगाच्या प्रतिबंधासाठी मॅंकोझेबची २ ते ३ किलो प्रतिएकर प्रमाणात धुरळणी करावी. तसेच कॉपर हायड्रॉक्साइड १.५ ग्रॅम प्रतिलिटर पाण्यात मिसळून फवारणी केल्यास केवडा रोगापासून संरक्षण मिळते.<br>➢ सध्याच्या वातावरणात जिवाणूजन्य करपा रोगाचा प्रादुर्भाव वाढण्याची शक्यता आहे. जिवाणूजन्य आणि बुरशीजन्य करपा या दोन्ही रोगांच्या नियंत्रणासाठी कासुगामायसिन अधिक कॉपर ऑक्सिक्लोराइड हे संयुक्त बुरशीनाशक ०.७५ ग्रॅम प्रतिलिटर पाण्यात मिसळून तात्काळ फवारणी करावी. या अवस्थेत अन्य कोणत्याही आंतरप्रवाही बुरशीनाशकाची फवारणी करण्याची आवश्यकता नाही. |
| पशुधन | वाढीची | ➢ गाभण गायींना अतिरिक्त १ किलो खुराक गर्भधारणेच्या ८ व्या महिन्यापासून तसेच म्हशींना अतिरिक्त १ किलो खुराक गर्भधारणेच्या ९ व्या महिन्यापासून द्यावा<br>➢ म्हशी, गाई, शेळया व मेंढया यांमध्ये तज्ञ पशूवैद्यकाच्या सल्ल्याने जंतनिर्मूलन करून घ्यावे<br>➢ प्रत्येक गायीला दररोज ५० ग्रॅम खनिज मिश्रण द्यावे. |

| | |
|---|---|
| मेघदूत ॲप्लिकेशन डाउनलोड करण्यासाठी स्कॅन करावे | दामिनी ॲप्लिकेशन डाउनलोड करण्यासाठी स्कॅन करावे |

स्त्रोत

१) हवामान पूर्वानुमान : प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई

ठिकाण : कोल्हापूर

दि. : ०१.०९.२०२६

**स्वाक्षरीत**
**प्रमुख अन्वेषक, ग्राकृमौसे, ऐएमएफयु, कोल्हापूर तथा**
**सहयोगी संशोधन संचालक,**
**विभागीय कृषि संशोधन केंद्र , कोल्हापूर**